# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडाळा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

3 जानेवारी 2024






वडाळा :-श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडाळा येथे आज दिनांक 3 जानेवारी 2024 रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली, माननीय प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांच्या निर्देशानुसार विजतंत्री विभागाच्या निदेशका संध्याराणी शिंदे मॅडम यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष पद भूषवले कार्यक्रमाचे उद्घाटक तसेच प्रमुख पाहुण्या म्हणून लोकमंगल इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका माननीय मोहिते मॅडम लाभल्या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. सावित्रीच्या लेकी शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांमध्ये यशस्वी कामगिरी करत आहेत, आज प्रत्येक शासकीय तसेच खाजगी आस्थापनेमध्ये महिलांचे यशस्वी योगदान इत्यादी विषयावर माननीय मोहिते मॅडम यांनी व्याख्यान दिले,लोकमंगल आयटीआय मधील डिझेल मेकॅनिक विभागात प्रशिक्षण घेत असलेल्या स्वप्निल मुळे या विद्यार्थ्याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, श्री बाळासाहेब जाधव सर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर आपल्या व्याख्यानाच्या रूपात मांडला. कार्यक्रमास आयटीआय मध्ये विविध व्यवसायात प्रशिक्षण घेत असलेल्या 70 विद्यार्थ्यांची उपस्थिती होती, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री संभाजी जाधव सर यांनी केले.